मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी 'ग्रॅप' प्रकल्पाची सुरुवात..

## हवेच्या गुणवत्तेच्या अंदाजावर निरीक्षणाद्वारे होणार ठोस कृती : निरीक्षण आणि सक्रियपणे कृती करण्यासाठी महत्वाचे धोरण तयार केले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी 'ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन' (GRAP) प्रकल्पाची सुरुवात केली आहे. याप्रकल्पामध्ये शहराची हवेची गुणवत्ता पद्धतशीरपणे सुधारली आहे याची खात्री करण्यासाठी वास्तविक वेळेमध्ये निरिक्षण प्रणाली, अत्याधुनिक अंदाज आणि तात्काळ अंमलबजावणी यांचा समावेश आहे. सदर प्रकल्पासाठी 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग' द्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ग्रॅप (GRAP) उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून महानगरपालिकेने हवेच्या गुणवत्तेच्या आव्हानांचा अंदाज, निरीक्षण आणि सक्रियपणे कृती करण्यासाठी महत्वाचे धोरण तयार केले आहे.

यासोबतच, महानगरपालिकेने नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम च्या अंतर्गत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महापालिका हद्दीमध्ये हवा शुद्धीकरण प्रणाली, धुके घालविणारी उपकरणे, रस्ता साफसफाई करणारी उपकरणे (रोड वॉशर) आणि पिचकारी आधारित पाण्याचे फवारे असणारी प्रणाली अशा विविध बाबींच्या माध्यमातून हवा प्रदुषित होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत..




**ग्रॅप प्रणाली द्वारे हवेच्या गुणवत्तेबाबत असे केले जाणार निरीक्षण...**

१. ग्रॅप प्रणालीच्या दोन, तीन व चार या टप्प्यांतर्गत सुधारित हवेच्या गुणवत्तेचा अंदाज हे सी-डॅक च्या 'निर्णय समर्थन प्रणाली' नुसार हवेच्या गुणवत्तेच्या अंदाजांवर तीन दिवस अगोदर सुरू केले जातील. सुचविण्यात आलेले उपाय किमान १५ दिवसांसाठी किंवा हवा गुणवत्ता निर्देशांक मध्ये लक्षणीय सुधारणा दिसून येईपर्यंत लागू करण्यात येतील. महानगरपालिका सी-डॅकच्या अंदाजानुसार, शहराच्या सर्व भागामधील पीएम २.५, पीएम १०, एनओ एक्स, एसओ एक्स सारख्या प्रदूषकांवर लक्ष केंद्रित करणार आहे.

२. वाहनांच्या प्रदूषणाची कठोर देखरेख ठेवण्यासाठी महत्वाची यंत्रणा निर्माण केली असून यामध्ये ANPR कॅमेरे आणि प्रत्यक्षरित्या कामावर असणारे कर्मचारी हे प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि आणि वाहतूक पोलिस यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या माहितीच्या आधारे एकात्मिक प्रणालीद्वारे उत्सर्जन नियंत्रण अनुपालन ट्रॅक करतील.

३. औद्योगिक आणि बांधकाम प्रदूषणावर एक पाळत ठेवणारी एजन्सी नेमण्यात आली असून यामध्ये ३२ क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसह ती आठ वॉर्डमध्ये, उल्लंघनाच्या सदैव निरीक्षणासाठी तैनात करण्यात आली आहे.

( उर्वरित पण २ वर )

> "पिंपरी चिंचवड शहराला प्रदुषणमुक्त करण्यासाठी ग्रॅप सारखा उपक्रम सुरु करणे म्हणजे शहराला प्रदुषणमुक्त करण्याच्या प्रक्रियेमधील एक मैलाचा दगड आहे. प्रगत तंत्रज्ञान, वास्तविक देखरेख आणि नागरिकांचा सहभागासह आम्ही शाश्वत विकासाला चालना देत आमच्या नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्याचे ध्येय ठेवले आहे. सदर उपक्रम पद्धतशीरपणे प्रदूषणाचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आला असून मी शहरातील सर्व घटकांना हे अभियान यशस्वी करण्यासाठी आपला सहभाग देण्याचे आवाहन करतो."
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> " ग्रॅप उपक्रमामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला असून वास्तविक देखरेखची अंमलबजावणी करण्यात येते. यामुळे प्रदूषण होणाऱ्या घटकांवर प्रभावीपणे कारवाई करण्यास मदत होत असून हा प्रकल्प शहराच्या शाश्वत विकासासाठी महत्वाची भूमिका पार पाडतो. शहराला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सदर उपक्रम म्हणजे प्रशासनाच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे."
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# वायसीएम रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना रात्रनिवारा केंद्र आता अल्प दरात उपलब्ध

## विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी काल झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना रात्रनिवारा केंद्र अल्प दरात उपलब्ध करून देण्याच्या विषयांसह महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी काल झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहामध्ये पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पिंपरी चिंचवड शहरातील तसेच लगतच्या ग्रामीण भागातून तसेच पुणे जिल्ह्याबाहेरील देखील रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी दीर्घकाळ दाखल होत असतात. शहराबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असून रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या वतीने रात्रनिवारा केंद्र उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रुग्णालयासमोरील आवारात महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या ११ मजली इमारतीच्या तळमजल्यावर फिजिओथेरपीच्या विभागालगतच्या जागेत रुग्णांच्या नातेवाईकांकरिता ही व्यवस्था करण्यात येणार आहे. या ठिकाणी नातेवाईकांनी स्वतः विश्रांती घेऊन त्यांच्या रुग्णांची देखभाल अथवा सुश्रुषा करणे अभिप्रेत आहे. रात्र निवारा केंद्रामध्ये पुरुषांसाठी ३५ बेड्स व महिलांसाठी २५ बेडची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार बेडच्या संख्येत बदल होऊ शकतो. महिला व पुरुषांसाठी प्रत्येकी ५ स्वच्छतागृहे ५ स्नानगृहांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे.




# धक्कादायक.. बांगलादेशी व्यक्तीने देहूरोडमध्ये जागा घेऊन घरही बांधले

## खोट्या कागदपत्रांच्या आधारे हे कृत्य केल्याचे समोर आले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

म्यानमारमधून बांगलादेशात आलेल्या आणि त्यानंतर पिंपरी चिंचवड शहराशेजारी असलेल्या देहूरोड येथे राहिलेल्या रोहिंग्या व्यक्तीने बनावट आधार कार्ड काढून जागा विकत घेतली आणि घर बांधून संसारही थाटल्याचं समोर आले आहे. विशेष म्हणजे या व्यक्तीवर जुलै महिन्यात पोलिसांनी कारवाई केली होती. त्यानंतरही त्याने खोट्या कागदपत्रांच्या आधारे हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. मुजल्लीम खान असं या रोहिंग्या व्यक्तीचे नाव आहे.

जुलै महिन्यात चार रोहिंग्या हे म्यानमारमधून बांगलादेशात आणि बांगलादेशातून थेट देहूरोड परिसरातील गांधीनगर येथे आले होते. हे चारही लोक पंडित चाळीत बेकायदेशीर पद्धतीने राहत असल्याची माहिती पिंपरी चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी या चौघांवर कारवाई केली. मात्र याच्यातील एक असलेल्या मुजल्लीम खान यांने देहूरोड येथे ८० हजार रुपयांना जागा विकत घेतली आणि त्या जागेवर घर बांधून संसार देखील थाटला.



बनावट कागदपत्र वापरून ही जागा बेकायदेशीर पद्धतीने विकत घेतल्याची माहिती आता समोर आली आहे. मुजलीम खान याने चंद्रभागा कांबळे यांच्याकडून ८० हजार रुपयांना ६०० चौरस फूट जागा खरेदी केली आणि त्या ठिकाणी घर बांधले.

मुजल्लीम खान याने म्यानमार येथील इस्लामिक संस्थेत मौलाना कोर्स पूर्ण केला आहे. तो आणि त्याची पत्नी दोन मुलांसह म्यानमार येथे राहत होता. त्यानंतर २०२२ मध्ये तो कुटुंबासह बांगलादेशात राहायला गेला. मात्र बांगलादेशात त्याला काम मिळाले नाही. त्यामुळे तो भारतात आला.

# सोसायटीधारकांचा संताप : कुदळवाडी येथील भंगार दुकाने तात्काळ हटवा!

## सोसायटी फेडरेशनची मागणी : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडी परिसरातील सर्व बेकायदेशीर स्क्रॅपची दुकाने, कारखाने, शॉप , गोडाऊन यांच्यावर कारवाई करून ही सर्व या भागातील अनधिकृत गोदामे हटवण्यात यावीत, अशी मागणी चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे.

याबाबत महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, कुदळवाडी ,मोशी, चिखली या परिसरामध्ये रहिवासी झोनमध्ये चार ते पाच हजार बेकायदेशीर, अनाधिकृत, कोणतीही परवानगी न घेता स्क्रॅपची दुकान, कारखाने, शॉप, गोडाऊन चालू आहेत. या ठिकाणी अनेक बेकायदेशीर धंदे केले जातात. तसेच या ठिकाणी लोखंड बारीक करणे, प्लास्टिक जाळणे, इतर विघातक ज्वलनशील पदार्थ जाळणे, अशा अनेक गोष्टी घडतात त्यामुळे या भागामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण, तसेच नदीच्या कडेला हे व्यवसाय असल्याने जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. या सर्व बेकायदेशीर गोष्टीमुळे या ठिकाणी मागच्या एका वर्षामध्ये 40 वेळा आगीच्या घटना घडलेल्या आहेत. परवाच या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात आग लागली होती.



### कारवाई करा अन्यथा आंदोलन...

» सोसायटी फेडरेशनकडून आमदार महेश लांडगे, पर्यावरण मंत्री, मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान तसेच आपल्या महानगरपालिकेकडे वारंवार लिखित तक्रारी देखील केलेल्या आहेत. तरीदेखील यावर डोळेझाक करून कोणतीही कारवाई केली जात नाही, ही अतिशय चुकीची आणि गंभीर बाब आहे. महापालिका प्रशासनाने पुढील महिन्याभरात या सर्व बेकायदेशीर गोष्टीवर कारवाई न झाल्यास आमच्या फेडरेशन तर्फे याबाबत लोकशाही मार्गाने आंदोलने व इतर घटनात्मक गोष्टी केल्या जातील याची नोंद घ्यावी, असा इशाराही सोसायटी फेडरेशनने दिला आहे.

### नागरिकांना सुरक्षीत वातावरण द्या...

» याबाबत भोसरी विधानसभेचे आदरणीय आमदार महेश लांडगे यांनी देखील महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनामध्ये आवाज उठवून याकडे माननीय मुख्यमंत्री तसेच सभागृहाचे लक्ष वेधले होते. यावर राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी कारवाई करण्याचे निर्देश आपल्याला दिलेले आहेत. तरी कृपया त्वरित या ठिकाणी असणारी ही सर्व बेकायदेशीर दुकाने कारखाने स्क्रॅपचे गोडाऊन त्याच्यावर कारवाई करून ही या अनाधिकृत भाविक काढून टाकून नागरिकांचे प्रदूषणापासून त्याचप्रमाणे इतर गोष्टीपासून संरक्षण करावे, असेही पत्रात म्हटले आहे.

> कुदळवाडी, मोशी, चिखली या परिसरामध्ये हजारो बेकायदेशीर स्क्रॅपची दुकान, गोडाऊन, शॉप्स आहेत. या ठिकाणी बेकायदेशीरपणे रबर, प्लास्टिक इतर ज्वलनशील पदार्थ जाळले जातात त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. तसेच, या ठिकाणी अनेक अनाधिकृत धंदे देखील चालवले जातात याबाबत वारंवार तक्रार करून देखील महानगरपालिका त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून कोणतीही कारवाई होत नाही. यावर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे अन्यथा फेडरेशन मार्फत खूप मोठ्या प्रमाणात आंदोलन केले जाईल .
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली- मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी

# रस्ते व फुटपाथवरील भाजी विक्रेत्यांवर कारवाई करा...

## महापालिकेच्या जनसंवाद सभेत नागरिकांची मागणी..

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये जनसंवाद सभा सोमवारी पार पडली. झालेल्या जनसंवाद सभेत ६७ तक्रारी वजा सूचना प्राप्त झाल्या.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांत करण्यात येते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या महापालिका क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबंधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये जनसंवाद सभेत मुख्य समन्वय अधिकारी तसेच क्षेत्रीय अधिकारी यांच्यासह विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ६७ तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १८, ६, ६, ३,२,८, ९ आणि १५ तक्रारी वजा सूचना मांडल्या.

यामध्ये शहरातील रस्ते सुस्थितीत ठेवावेत, रस्ते व फुटपाथ वरील भाजी विक्रेत्यांवर यांच्यावर कारवाई करावी, रस्त्यांच्या कडेला कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करावी, शहरामध्ये आवश्यक ठिकाणी स्थळदर्शक, दिशादर्शक आणि मार्गदर्शक फलक लावावेत, अनधिकृत बांधकामांवर कारवाई करावी, शहरातील धोकादायक झाडे तोडणे तसेच रस्त्यांवर झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी, उद्यानातील नादुरुस्त खेळणी, ओपन जिम साहित्य दुरुस्त करावे, शाळा महाविद्यालयांच्या परिसरात वेगाने दुचाकी चालवणाऱ्या लोकांवर कारवाई करावी तसेच गतिरोधक उभारण्यात यावेत आदी सूचनांचा समावेश होता.

नागरिकांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन संबंधित समस्यांचा निपटारा करण्यासाठी महापालिका यंत्रणा कार्यरत असून क्षेत्रीय कार्यालयनिहाय सबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

# शहरातील हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी 'ग्रॅप' प्रकल्पाची सुरुवात..

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून)

**हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या स्तरांवर चार टप्प्यांचा ग्रॅपचा कृती आराखडा...**

शहरातील हवेच्या गुणवत्तेच्या पातळीनुसार त्यावर उपाय करण्यात येणार आहेत. यामध्ये उपाययोजनांसाठी हवा गुणवत्ता निर्देशांकाचा आधार घेऊन त्याआधारे चार टप्पे करण्यात आले आहेत.

टप्पा १ – (हवा गुणवत्ता निर्देशांक १०१ – ३००) : रस्त्यावरील धूळ नियंत्रित करणे, बेकायदेशीर कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार.

टप्पा २ – (हवा गुणवत्ता निर्देशांक ३०१ – ४००) : डिझेल जनरेटरवरील निर्बंध, रस्त्यांची स्वच्छता आणि सार्वजनिक वाहतुकीचा प्रचार यांचा समावेश आहे.

टप्पा ३ – (हवा गुणवत्ता निर्देशांक ४०१- ५००) : अत्यंत प्रदूषण करणारे उद्योग बंद करण्यात येणार, वाहनांच्या प्रतिबंधात्मक क्षेत्र तयार करुन उल्लंघनावर कठोर दंड आकारण्यात येणार.

टप्पा ४ – (हवा गुणवत्ता निर्देशांक ५०० हून अधिक) : प्रदूषणाला आळा घालण्यासाठी वाहन बंदी, संभाव्य शाळा बंद आणि कडक दंड लागू करण्यात येणार.

**प्रदूषणाबाबत पाळत ठेवण्यासाठी नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांकडून रात्रं-दिवस गस्त...**

महानगरपालिकेने ग्रॅप प्रणालीचा एक भाग म्हणून पर्यावरणीय प्रदूषणाचा सामना करण्यासाठी ठोस उपाययोजना सुरू केल्या आहेत. प्रदुषणाबाबत पाळत व दक्षता ठेवण्यासाठी, विविध प्रकारच्या कचरा – संबंधित व पर्यावरणीय उल्लंघनांवर नियंत्रण व गस्त घालण्यासाठी एक समर्पित एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये १ प्रोजेक्ट मॅनेजर, ४ पर्यवेक्षक, २ डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि ३२ जणांचा प्रत्यक्ष जागेवरील कर्मचाऱ्यांचा व ३९ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये नेमण्यात आलेल्या एजन्सीद्वारे स्वच्छ इंधन वाहनांचा वापर करून कर्मचाऱ्यांकडून शहरामध्ये रात्र-दिवस गस्त घालण्यात येईल.

**म्हणून ग्रॅप प्रकल्प आहे महत्वाचा...**

१) सक्रियपणे हवेच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन: ग्रॅपच्या माध्यमातून हवा गुणवत्ता निर्देशांकांच्या अंदाजांवर आगाऊ उपायांवर शोधले जाऊन प्रदूषणाची जोखीम प्रभावीपणे कमी करण्यास मदत होते.

२) संरचित दृष्टीकोन: हे वायू प्रदूषणाच्या विविध स्तरांवर म्हणजेच मध्यम ते गंभीर अशा टप्प्याटप्प्याने प्रतिसाद योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात येते.

३) सार्वजनिक आरोग्याचे रक्षण: ग्रॅपनुसार थेट प्रदूषणाच्या प्रमुख स्रोतांवर उपयायोजना केल्याने खराब हवेच्या गुणवत्तेशी संबंधित आरोग्य धोके कमी करण्यात मदत होते.

४) शहरी राहणीमानामध्ये सुधारणा: नागरिकांचा सहभाग व हवेच्या गुणवत्तेसाठी विविध आधारावर विविध घटकांची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी केल्याने नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यास मदत होते.

# 'सारथी'च्या प्रभावी अंमलबजाणीचा संकल्प

## विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, अन्यथा कारवाई : आयुक्त शेखर सिंह यांचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या सारथी पोर्टलसह इतर माध्यमांतून आलेल्या तक्रारींचा निपटारा विहीत वेळेत करून कोणत्याही तक्रारी प्रलंबित राहणार नाहीत याची सर्व विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी अन्यथा संबंधितांवर कारवाई केली जाईल असा इशारा आयुक्त शेखर सिंह यांनी दिला.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात झालेल्या बैठकीत सारथी पोर्टल, आपले सरकार, पीजी पोर्टल, सीएमओ पोर्टल अशा विविध तक्रार निवारण प्रणालींवर आलेल्या तक्रारींचा व त्यावर संबंधित विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीचा आढावा आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले, मनोज सेठिया, संजय खाबडे, उप आयुक्त विठ्ठल जोशी, अविनाश शिंदे, अण्णा बोदडे, निलेश भदाने, मनोज लोणकर, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अजिंक्य येळे, उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, किशोर ननवरे, अमित पंडित, सीताराम बहुरे, राजेश आगळे आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, सारथी पोर्टल आणि ॲपद्वारे नागरिक महापालिकेशी संबंधित तक्रारी नोंदवित असतात. नागरिकांचे प्रश्न जलद गतीने सोडवून त्यांच्या तक्रारींचा निपटारा तात्काळ करणे आवश्यक असते. महापालिकेच्या वतीने पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत असताना त्याचे कार्यान्वयन व्यवस्थितपणे सुरू राहील याकडे महापालिका प्रशासनाने सातत्याने लक्ष दिले पाहिजे. त्यातून नागरी समाधानाचा निर्देशांक वाढण्यासाठी मदत होत असते.

### गांभीर्याने तक्रारींचा निपटारा करा..

» महापालिकेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांबद्दल नागरिक तक्रारवजा सूचना विविध तक्रार प्रणालींद्वारे नोंदवित असतात. अशावेळी संबंधित विभागाने तक्रारींचा प्राधान्यक्रम ठरवून त्यांचे विहीत वेळेत निराकरण केले पाहिजे. निराकरण केल्यानंतर त्याची नोंद संबंधित पोर्टलवर देखील तात्काळ घेतली गेली पाहिजे. त्यामुळे सर्व विभागप्रमुखांनी अशा तक्रारींची दखल घेऊन गांभीर्याने या तक्रारींचा निपटारा करण्यावर भर द्यावा. विभागप्रमुखांच्या पातळीवर वेळोवेळी या तक्रारींचा आढावा घेऊन निपटारा करण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी यावेळी दिल्या. तसेच प्राप्त तक्रारी जाणीवपुर्वक प्रलंबित ठेवल्यास अशा विभागप्रमुखांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त सिंह यांनी यावेळी दिला.

---

# अडीच लाख मालमत्ताधारकांनी बुडविला कर!

## संबंधित मालमत्ताधारकांना मागील सहा वर्षांपासून करआकारणी करण्याचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात २,५१,१६५ करकक्षेत नसलेल्या मालमत्ता आढळल्या आहेत. यांपैकी २,०३,८९४ मालमत्तांची मोजणी पूर्ण झाली असून, करआकारणीची कार्यवाही सुरू झाली आहे. १,१३,८३१ मालमत्ताधारकांना करआकारणीसाठी कागदपत्रे सादर करण्यासाठी नोटीस बजाविण्यात आली आहे. नोटीस देऊनही कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास संबंधित मालमत्ताधारकांना मागील सहा वर्षांपासून करआकारणी करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात ६,३३,२९४ मालमत्ता नोंदणीकृत आहेत. शहर दिवसेंदिवस वाढत असताना मोठ्या प्रमाणात नोंदणी न झालेल्या मालमत्ता असण्याची शक्यता होती. याचाच विचार करून महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि. या खासगी संस्थेमार्फत शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात २,५१,१६५ मालमत्ता नोंदणी नसलेल्या आढळून आल्या आहेत. या सर्व मालमत्ताकर कक्षेत आणण्याची कार्यवाही करसंकलन विभागाकडून सुरू आहे. करआकारणीसाठी आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नोटीस, संदेश पाठविण्यात आले आहेत. जे मालमत्ताधारक करआकारणीसाठी नोटीस बजावूनही कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत, त्यांना याबाबत कोणतेही स्वारस्य नाही, असे समजण्यात येणार आहे. त्यामुळे नियमानुसार मागील सहा वर्षांपासून संबंधित मालमत्तांना करआकारणी केली जाणार आहे.

इमारत, जमीन, सदनिका मालकी हक्काची कागदपत्रे, खरेदीखत, सातबारा उतारा ही कागदपत्रे जमा करावी लागणार आहेत. एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडील मालमत्ता असल्यास दस्त व संबंधित संस्थेने निर्गमित केलेल्या ताबापत्राची सत्यप्रत, मिळकतीबाबत नोंदणीकृत बक्षीसपत्र, वाटणीपत्र झाले असल्यास त्याची सत्यप्रत, इमारत बांधकाम परवानगीप्राप्त असल्यास मंजूर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व मंजूर नकाशाची प्रत देणे आवश्यक आहे.

### 234 कोटींची थकबाकी

» थकबाकी असलेल्या ५०५९ मालमत्तांचे जप्ती अधिपत्र काढण्यात आले आहे. या मालमत्ताधारकांकडे २३४.३१ कोटींची थकबाकी आहे. जप्ती अधिपत्र सादर केलेल्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचा आदेश करसंकलन विभागाने दिले आहेत.

### नळजोड खंडित करण्याची कारवाई

» मालमत्ता जप्तीसोबतच आता थकबाकीदारांच्या मालमत्तांचे नळजोड खंडित केले जाणार आहेत. थकीत मालमत्ताकरावर प्रतिमहिना दोन टक्के विलंब शुल्क आकारले जाणार आहे. त्यामुळे मालमत्ताधारकांनी तात्काळ कराचा भरणा करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

# बेकायदा फ्लेक्सबाजीवर कारवाई सुरु

## महापालिकेच्या मोहिमेत 659 अनधिकृत होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स काढले : 95 जणांविरुद्ध पोलिसांत तक्रार

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विजयी उमेदवारांचे उत्साही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बॅनर तसेच मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजीद्वारे अभिनंदन केले. बेकायदा फ्लेक्सबाजी करून शहर विद्रुप केल्याप्रकरणी महापालिकेकडून कारवाई केली जात होती. या मोहिमेत ६५९ अनधिकृत होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स काढण्यात आले असून संबंधितांकडून ५ लाख २३ हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे.

२३ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या दरम्यान आकाश चिन्ह विभागाने मोहीम आखली होती. ही मोहीम अशीच सुरू राहणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. शहराचे विद्रुपीकरण होत असून महापालिकेचे अधिकाऱ्यांनी डोळ्याला पट्टी लावून आर्थिक लाभाचे धनी होत आहेत, असा आरोप पुणेकरांकडून केला जातो. तसेच राजकीय व्यक्तींसह त्यांच्या कार्यकर्त्यांवर कोणतीही करवाई करण्याचे धाडस महापालिकेकडून दाखवले जात नाही, असेही दिसून आले आहे.



पुणेकरांनी टीकेची झोड उठवल्यानंतर महापालिकेने अतिक्रमणविरोधी कारवाई मोहीम राबवून विभागाने ६५९ अनधिकृत फ्लेक्स काढले आहेत. तसेच बेकायदा फ्लेक्सबाजी केल्याप्रकरणी ९५ जणांच्या विरोधात पोलिसांत तक्रार केली असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीचे मतदान झाल्यानंतर लगेचच काही उत्साही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बॅनर लावून नेत्यांचे अभिनंदन करण्यास सुरुवात केली होती. निकालानंतर उत्साही कार्यकर्त्यांचा उत्साह आणखी वाढण्याची शक्यता गृहित धरण्यात आली होती. ही शक्यता पाहून तसेच विजयी आमदाराच्या कार्यकर्त्यांकडून बेकायदा फ्लेक्सबाजीवर पुणे महापालिका प्रशासनाने विजयी आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर महापालिका अधिनियम २४४, २४५ अन्वये कारवाई करण्याचा इशारा दिला होता. परंतु त्यानंतरही शहरभर बेकायदा फ्लेक्सबाजी करण्यात आली होती.

महापालिकेने काढलेल्या आदेशात न्यायालयात प्रलंबित जनहित याचिकांअंतर्गत वेळोवेळी सविस्तर आदेश पारित करण्यात आल्याचे नमूद केले होते. या अंतर्गत महापालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागामार्फत शहरात लावण्यात आलेल्या अनधिकृत तसेच विनापरवाना होर्डिंग्ज, फलक, बॅनर्स, पोस्टर्स यांच्यावर कारवाई करण्यात येते.

अशा परिस्थितीत विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर "अनधिकृत होर्डिंग्ज, फलक, बॅनर, पोस्टर्स लावू नका. परवान्याशिवाय पोस्टर्स, बॅनर, होर्डिंग लावल्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २४४, २४५ अन्वये कारवाई करण्यात येईल," असा इशारा देण्यात आला होता. मात्र त्यानंतरही फ्लेक्सबाजी करण्यात आली. अद्यापही बेकायदा फ्लेक्सबाजी करण्यात येत आहे. महापालिकेच्या इशाऱ्याला या कार्यकर्त्यांकडून केराची टोपली दाखविली जात आहे.

### या संस्था, व्यक्तींवर केली कारवाई


१) श्री साई डेव्हलपर्स, आदर्श कॉलनी, टिंगरेनगर, विश्रांतवाडी
२) पी अँन्ड लँड डेव्हलपर्स, आदर्श कॉलनी, विश्रांतवाडी
३) साई क्रांती डेव्हलपर्स, विश्रांतवाडी
४) किचन स्टोरी डिलिशियस टिफिन, बंडगार्डन रोड
५) ॲपल प्रॉडक्ट रिपेअर सर्व्हिस, कोरेगाव पार्क
६) लक्स वेडिंग, कोरेगाव पार्क
७) खराडी फॅक्टरी आउटलेट, कोरेगाव पार्क
८) योगीराज कन्स्ट्रक्शन, नऱ्हे
९) युनिक रेसिडेन्सी, नऱ्हे
१०) जय गणेश डेव्हलपर्स
११) ट्री हाऊस हायस्कूल, कर्वेनगर
१२) श्रीनाथ डेव्हलपर्स, कर्वेनगर

# दापोडी निगडी मार्गावर आता एकसमान रचनेचे पदपथ

## स्थापत्य व विद्युत विभाग हे काम एकाच वेळी एकत्रित पद्धतीने करणार

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर दापोडी येथील हॅरिस पूल ते निगडीच्या भक्ती-शक्ती समूहशिल्प चौकापर्यंतच्या मार्गावर 'अर्बन स्ट्रीट डिझाइन'नुसार एकसमान रचनेचे पदपथ तयार करण्यात येणार आहेत. रस्त्यांची रुंदी कमी न करता आणि एकही झाड न तोडता पदपथ सुशोभित केले जाणार असल्याने या मार्गाचा कायापालट होईल, असा दावा महापालिकेने केला आहे.



पहिल्या टप्प्यात हॅरिस पूल ते पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक या दोन्ही बाजूच्या सेवा मार्गावर अर्बन स्ट्रीट डिझाइनचे काम केले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात पिंपरीतील डॉ. आंबेडकर पुतळा चौक ते निगडीच्या भक्ती-शक्ती समूहशिल्प चौकापर्यंतचे काम केले जाणार आहे. स्थापत्य व विद्युत विभाग हे काम एकाच वेळी एकत्रित पद्धतीने करणार आहेत.

महापालिकेने घरे आणि दुकाने तोडून दापोडी ते निगडी हा १२.५० किलोमीटर अंतराचा समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) तयार केला. त्यानंतर १५ वर्षांनी पदपथ, सायकल ट्रॅक व सुशोभीकरणासाठी या रस्त्यावर १७० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. एकसमान पदपथ आणि सुशोभीकरणामुळे या मुख्य मार्गावरून ये-जा करताना वाहनचालक आणि पादचाऱ्यांचा सुखद अनुभव मिळेल, असा दावा महापालिकेने केला आहे.

दापोडी ते निगडी मार्गावरील प्रत्येक चौकात रस्ता ओलांडण्याची सुविधा असणार आहे. सायकल मार्गामुळे सायकल चालविण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. एकसमान आकाराचे पदपथ आणि सुशोभीकरण केल्याने रस्त्याच्या सौंदर्यात भर पडणार असल्याचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

### सायकल मार्ग

» भित्तिचित्रे व आकर्षक चित्रे लावून परिसर सुशोभित केला जाणार आहे. या मार्गावर व्यायामाचे साहित्य ठेवले जाणार आहे. एकसमान आकाराचे एलईडी दिव्यांचे विद्युत खांब उभारण्यात येणार आहेत. रस्त्यांवर लाल रंगाचे पट्टे मारून सायकल मार्ग बनविला जाणार आहे.

### वाहतूककोंडी

» दापोडी ते निगडी हा १२.५० किलोमीटर अंतराचा आठ पदरी रस्ता २००४ ते २००८ या काळात तयार करण्यात आला. रस्ता करताना महापालिकेस प्रचंड विरोध सहन करावा लागला. इतक्या मोठ्या रुंदीच्या रस्त्याची आवश्यकता का आहे, असे प्रश्न त्या वेळी केले गेले होते. या मार्गावर बीआरटी सेवा सुरू आहे. आता मेट्रो मार्गिका, अर्बन स्ट्रीट डिझाइनचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्ता अरुंद झाला असून, वाहतूककोंडीत भर पडत आहे.